प्रकरण पहिले

दलित साहित्याची भूमिका

प्रकरण पहिले

दलित साहित्याची भूमिका.

श्री बाबूराव बागूल यांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' आणि 'मरण स्वस्त होत आहे' या दोन कथासंग्रहांचा आणि 'सूड' या दीर्घ कथेचा अभ्यास करणे व तो करताना कथालेखक बाबूराव बागूल यांची दलित कथालेखक म्हणून कोणती वैशिष्टये आढळतात त्याचे विवेचन करणे हे प्रस्तुत शोधनिबंधाचे उद्दिष्ट आहे. दलित कथालेखक म्हणून काही वेगळी वैशिष्टये त्यांच्या कथेला प्राप्त झाली आहेत काय ? दलित कथालेखक म्हणूनच त्यांना श्रेष्ठता प्राप्त झाली, की त्यांच्या कथांतील अन्य काही वैशिष्ट्यामुळे त्यांना मान्यता मिळाली याचाही विचार या शोधनिबंधात करावयाचा आहे. या दृष्टिकोनातून त्यांच्या कथांचा अभ्यास करण्यापूर्वी दलित साहित्याचे स्वरूप काय, त्याच्या प्रेरणा कोणत्या हे बघणे आवश्यक ठरणार आहे. त्यासाठी दलित साहित्य-विषयक अनेक भूमिकांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. दलित साहित्याची चळवळ ही गेल्या पंचवीस तीस वर्षातील असली तरी ह्या साहित्यावर विपूल समीक्षात्मक लेखन झालेले आहे. समीक्षकांनी आपापली दलित साहित्यविषयक भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला आहे. इतर अनेक समीक्षकाप्रमाणे खुद्द बागुलांनीसुध्दा दलित साहित्याबद्दल स्वत:ची भूमिका मांडली आहे. तेव्हा प्रस्तुत प्रकरणात दलित साहित्याचे स्वरूप या विविध भूमिकांच्या अनुरोधाने लक्षात घेण्याचा प्रयत्न करू.

दलित साहित्याचे स्वरूप समजून घ्यावयाचे असेल तर दलित साहित्याची निर्मिती कोणत्या परिस्थितीत झाली ? ती तशी का झाली ? दलित साहित्याच्या उगमविस्तारामागे कोणती प्रेरणा होती ? याचा विचार करणे योग्य ठरेल.

शिक्षण ही पूर्वीच्या काळी विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. उच्चवर्णीय आणि मध्यमवर्गीयांनाच शिक्षणाचे क्षेत्र मुक्त होते. समाजातील खालच्या मानलेल्या वर्णाला आणि स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार परंपरेने नाकारला होता. एकंदरीत बहुजन समाजच शिक्षणाला वंचित झालेला होता. स्वाभाविकपणेच समाजाच्या खालच्या स्तरात असणारा, गावकुसाबाहेर आपले जीवन व्यतीत करणारा जो दलित समाज होता, त्याला शिक्षण मिळू शकत नव्हते. पारंपारिक पध्दतीचे हीनदीन जिणे तो जगत होता.

स्वातंत्र्यापूर्व काळात महर्षी वि. रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे अल्प प्रमाणात दलित वर्गास व बहुजन समाजास शिक्षण मिळू लागले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या दशकात मात्र परिस्थितीत थोडासा फरक पडला. महाराष्ट्र शासनाच्या धोरणामुळे शिक्षणविषयक सवलती बहुजन समाजाला व दलितांना मिळू लागल्या. दलित वर्गाला तर अधिक सवलतीची गरज होती व थोड्याफार अधिक प्रमाणात त्यांना त्या मिळू लागल्या. ह्या सवलतीमुळे दलित वर्गात शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. नवशिक्षित दलितवर्ग पुढे येऊ लागला व ह्या शिक्षणाचा स्वाभाविक परिणाम म्हणून साहित्यनिर्मिती करु लागला.

स्वातंत्र्यपूर्वकाळात मराठीतील लेखकवर्ग हा प्राधान्याने मध्यम-वर्गीयच होता. वाङ्मयप्रांतातइतरांना शिरकाव जवळ जवळ नव्हताच. परंतु समाजसुधारकांच्या प्रभावी कार्याने व महाराष्ट्र सरकारच्या पुरोगामी धोरणामुळे शिक्षणाचा प्रसार झाला आणि मूक दलित समाजाला वाचा प्राप्त झाली, निद्रित असलेला खालचा स्तर जागृत होऊन आपले अनुभव व्यक्त करु लागला.

वेगळ्या जगाचे दर्शन.

आपणही लिहू शकतो, बोलू शकतो ही आत्मविश्वासाची जाणीव दलित वर्गात निर्माण झाल्यामुळे पांढरपेशी विश्वाला माहित नसलेले, अस्वस्थ करणारे अनुभव ते व्यक्त करू लागले.

वेड्यापाड्यातून गावाच्या बाहेर राहणारा, ज्यांचे सामाजिक मूल्य शून्य होते असा आणि शहरात कुठल्यातरी चाळीत, झोपडपट्टीत राहणारा पण दुर्लक्षिला गेलेला, दबलेला, उपेक्षित असा जो वर्ग होता, त्याला आलेल्या नवजागृतीमुळे, माणूस म्हणून जागा झालेल्या दलिताने साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात पदार्पण केले.

भारतातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, समाजव्यवस्था यांच्या क्रूर जाचाखाली वर्षानुवर्षे अमानुषपणे भरडल्या गेलेल्या दलित समाजाच्या वेदनेचे दुःखी सूर, असहाय्य वेदना मराठी वाङ्मयात उमटू लागल्या. माणुसकी उध्वस्त करणाऱ्या रूढी परंपरा, त्यातून निर्माण झालेले दुःख दुःखातून निर्माण झालेली आक्रमकता या सर्वांचे जिवंत चित्रण त्यांच्या अनुभूतीतून साकार होऊ लागले. पांढरपेशा जगाला कधीही परिचित नसलेल्या जगाचे त्या साहित्यातून दर्शन होऊ लागले. त्यातूनच एक नवा पण प्रभावी प्रवाह मराठी साहित्यात अवतीर्ण झाला आणि तो म्हणजे दलित साहित्य.

तळागाळातील लोकांच्या जीवनातील दुःख, त्या दुःखी अन्यायी जीवनातून निर्माण झालेला संताप, विद्रोह आणि परंपरेविरुद्ध बंड यांचे दर्शन दलित साहित्यातून होऊ लागले आणि हे सर्व मराठी साहित्याला नवीन होते. विद्रोही साहित्याने वेगळ्या जगाचे दर्शन होऊ लागले.

दलित साहित्यविषयक विविध भूमिका·

वेगळ्या जगाचे, अनुभवाचे चित्रण करणाऱ्या ह्या प्रवाहाला दलित साहित्य म्हणून मराठी साहित्यात मान्यता मिळाली आहे· मराठी साहित्यातील या नव्या प्रवाहाच्या स्वरूप, प्रेरणा, भूमिकेविषयी अभ्यासकांमध्ये अनेकप्रकारचे मतभेद आहेत· मराठी साहित्याचा प्रांत म्हणून जरी दलित साहित्याला मान्यता मिळालेली असली तरी या संदर्भात भिन्नभिन्न भूमिका मांडल्या जाताना दिसतात· प्रत्येकाचा दलित साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे त्यानुसारच त्यांनी आपल्या भूमिका मांडल्या आहेत·

म·ना· वानखेडे, म· भि· चिटणीस, शंकरराव खरात, राजा ढाले, सदा कऱ्हाडे, शरच्चंद्र मुक्तीबोध, प्रभाकर मांडे, नरहर कुंदकर, दया पवार, रा· भि· जोशी, केशव मेश्राम, बाबुराव बागूल ह्या [redacted] दलित आणि दलितेतर समीक्षकांनी आपापली दलित साहित्यविषयक भूमिका लेखन, व्याख्याने, चर्चा याद्वारे मांडली आहे·

उपरोक्त अभ्यासकाची दलित साहित्याकडे पाहण्याची दृष्टी कशी होती हे समजून घेतल्याने दलित साहित्याची स्वरूप वैशिष्ट्ये कळावयास मदत होईल·

दलित साहित्याचे स्वरूप पाहताना दलित कुणास म्हणावे आणि दलित साहित्याची नेमकी कोणती व्याख्या स्वीकारावी या बाबतीत अनेक मतमतांतरे आहेत·, त्या सर्व मतांचा विचार प्रस्तुत प्रकरणात करून बागुलांची भूमीका कोणती, तिचा इतरांहून वेगळेपणा काही आहे काय, हे पाहू· कारण त्यांच्या भूमिकेमुळे त्यांच्या साहित्याला काही एक वेगळेपण व वैशिष्ट्यपूर्णता प्राप्त झालेली असणार·

कुणी भारतीय समाज व्यवस्थेच्या संदर्भात जातीचा समूह या अर्थाने दलित व त्याचे जे साहित्य ते दलित साहित्य अशी भूमिका घेतात, तर काही विचारवंतानी दलित या शब्दाचा अर्थ आर्थिक दृष्टिकोणातून मांडलेला आहे व त्याच्या साहित्याला दलित साहित्य म्हटले आहे. सामाजिक व सांस्कृतिक दृष्टया मागासलेल्या लोकांनी लिहिलेल्या साहित्याला दलित साहित्य असे काही म्हणतात. नकार, विद्रोह प्रक्षोभ यांनी युक्त साहित्यालाही काहीजण दलित साहित्य म्हणतात.

दलित साहित्याची भूमिका विशद करणाऱ्या विचारवंताच्या विचारांची वर्गवारी आपणास खालील प्रमाणे करताँ येईल.

१. नकार, विद्रोह यांना प्राधान्य देणाऱ्या भूमिका
२. आर्थिक शोषणाला प्राधान्य देणाऱ्या भूमिका, आणि
३. समन्वयवादी व्यापक भूमिका.

या विविध भूमिकांचे स्वरूप थोडक्यात पाहू.

<u>नकार, विद्रोह यांना प्राधान्य देणाऱ्या भूमिका.</u>

म.न. वानखेडे दलित साहित्याविषयी आपली भूमिका मांडताना म्हणतात, " दलित साहित्य म्हणजे दलित लेखकांनी, दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक, विद्रोही साहित्य. ही मानवतेची भोंगळ भावना नाही. त्यात दलितांच्या पीडितांच्या स्थितीला कारणीभूत असणाऱ्या परंपरेवर कडाडून हल्ला केलेला असतो. म्हणून तो आता स्वतंत्रपणे लेखणी चालवू लागला आहे व चीड व्यक्त करु लागला आहे .... दयेच्या याचनेऐवजी हा लेखक आग ओकू पाहात आहे .... ही असल्यावर ढोंगावर, अन्यायावर चिडीने आसूड मारणारी, समाजाला जोडणारी वृत्ती आहे. "

वानखडे यांनी मांडलेल्या भूमिकेमध्ये जन्मजात दलितत्वाचा विचार केला आहे. या जन्मजात दलितत्वामुळे भोगाव्या लागणाऱ्या वेदनांविरुद्ध, रुढीविरुद्ध; जाचक सामाजिक प्रथापरंपरा विरुद्ध दलित साहित्यिक ठामपणे उभा राहतो, आपल्या मनातील भावना, विद्रोह तो प्रक्षोभकपणे व्यक्त करीत असतो. हेच इथे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. वानखडे दलित साहित्याकडे सामाजिक दृष्टिकोनातून पाहात होते हे इथे स्पष्ट होते.

म. भि. चिटणीस दलित साहित्यविषयक भूमिका मांडताना म्हणतात. " दलित साहित्य म्हणजे धर्माने आणि सामाजिक रुढीने ज्यांना आजवर बहिष्कृत मानले त्या दलित लेखकांचे साहित्य .... त्यांचे स्वतंत्र असे एक अनुभवविश्व आहे. अस्पृश्यतेमुळे त्यांना आलेले आणि आजही येणारे, त्यांची माणुसकीच प्रश्नांकित करणारे कटू अनुभव, त्यांच्या भावनिक प्रतिक्रियेची तीव्रता ही आर्थिकदृष्टया दलित असणाऱ्यांच्या वाटयास कधीच येत नाही. त्याचे कारण सांगताना ते पुढे म्हणतात, दलित वर्गाला आपल्या भावना, इच्छा, आकांक्षा एकूणभावानुभवांचा वाङ्मयीन अविष्कार, त्यांच्यावर धर्माने लादलेल्या निरक्षरतेमुळे आणि निर्बंधामुळे निषिद्ध असल्याकारणाने, त्याचप्रमाणे सामान्य माणसाची प्रतिष्ठाही त्याला नाकारली असल्यामुळे आज होऊ लागलेला त्याचा आत्माविष्कार, हा समाजद्रोही भूमिका घेत आहे. हे स्वाभाविक आहे. कारण जिथे आत्मविष्कारातील आत्मतत्त्वच, व्यक्तिमत्त्वच निषेधिले जाते, तिथे आत्मविष्काराचा प्रयत्न आत्म्याला निषेधिणाऱ्या समाजाशी विद्रोह अथवा संघर्षात्मक भूमिका घेऊन अवतरणार "[३]

म. भि. चिटणीस हे दलित साहित्याच्या चळवळीचे एक प्रेरक व त्याबद्दल विचार करणारे साक्षेपी समीक्षक आहेत. दलित वाङ्मयाकडे

ते सामाजिक आणि सांस्कृतिक भान ठेवूनच पाहतात. म्हणून दलित साहित्याची भूमिका प्रतिपादन करताना धर्मविचार, त्याला नकार आणि समाजाशी विद्रोह या सामाजिक गोष्टींना ते प्राधान्य देतात.

ग. बा. सरदार दलित साहित्याविषयी म्हणतात, या दलित वाङ्मयात कदाचित साहित्यगुण कमी असतील पण नव्याने जाग आलेल्या माणसाची तीव्र संवेदनशीलता व मुक्त भावनोद्रेक त्यात काठोकाठ भरून राहिला आहे. त्यात दुबळेपणाला थारा नाही. त्यांची भाषा उघडउघड विद्रोहाची, आव्हानाची आहे. आपल्या पूर्वपरंपरेचा त्याचा अनुभव इतका कडवट व क्लेशदायक आहे की, तिच्यावर प्रहार करताना त्यांना मागेपुढे पाहण्याचे काही कारण नाही. दलितांचा लढा हा समाजातील एका मोठ्या लढ्याचा भाग आहे. हा लढा सामाजिक जीवनातील गुलामगिरी, शोषण व मनुष्यात्वाची विटंबना नाहीशी करण्याचा लढा आहे. "[४] ग. बा. सरदार हे दलित साहित्यातील विद्रोह, पूर्वपरंपरेला नकार, गुलामगिरी, शोषण, मनुष्यात्वाची विटंबना या बद्दलचा संतापयुक्त आविष्कार या सर्वांचे स्वागत करताना हया चित्रणामागील प्रेरणा अधिक व्यापक असाव्यास हव्यात ही अपेक्षा प्रकट करतात.

राजा ढाले यांनी दलित साहित्यविषयक आपले विचार नाकेबंदी या जगदीश पवारांच्या काव्यसंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहेत. अस्मितादर्शच्या दिवाळी अंकात दलित साहित्य विषयक भूमिकेचा मागोवा घेण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याचे जाणवते. ते म्हणतात, " काही लोक दलित या शब्दापासून ध्वनित होणारी आपली अस्पृश्यता सोईस्करपणे विसरून त्यातील आर्थिक मागासलेपणाच आपले दुःख म्हणून मांडत आहेत .... दलितांच्या आर्थिक कोंडीचे मूळ ही अस्पृश्यतेने केलेल्या आमच्या कोंडीतच आहे हे त्यांना कसे कळणार ?[५]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

राजा ढालेंच्या या प्रश्नातव त्यांची दलित साहित्यविषयक भूमिका स्पष्ट होते. दलित शब्दाला व्यापक करून मूळचा विचार नष्ट करण्याऐवजी बौध्द साहित्य असे त्याला नाव द्यावे असा त्यांचा आग्रह आहे. कारण बौध्द हा नवा संस्कार, नवा जीवनमार्ग, नवे जीवनमूल्य आहे असे ते मानतात. दलितांना शोषित म्हणण्याऐवजी बौध्द म्हणून स्वीकारल्याने, आंबेडकरांच्या विचाराचा वसा घेतल्याने खरे दलित साहित्य निर्माण होईल असे ढालेंना वाटते. आर्थिक दृष्टिकोनातून दलित साहित्याकडे पाहण्यापेक्षा सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भाने पाहणेच योग्य ठरणार आहे अशी ढाले यांची भूमिका आहे.

रा. भि. जोशी : म्हणतात, " दलित साहित्यातील संतापाचा प्रक्षोभाचा आणि विद्रोहाचा सारा रोख हिंदू समाजाच्या सांस्कृतिक परंपरेवर आहे. विषमतेवर आधारलेल्या ह्या परंपरेने माणसाला अस्पृश्य मानले. इतकेच नव्हे तर, त्यांना पशूहूनही वाईट जिणं जगायला लावले... साहित्यिकांनी किंवा सुधारकांनी ह्या परंपरेविरुध्द कधी बंड केले नाही किंवा जोराने आक्रोश केला नाही. केला असला तरी त्यांच्यापैकी कोणीही अस्पृश्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी, अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्राणाचे मोल देण्याची तयारी दाखविली नाही. म्हणून त्या साहित्याविरुध्द आणि परंपरेविरुध्दही त्यांचा रोख आहे .... बहुसंख्य स्पृश्य हिंदूना अजूनही अस्पृश्य हे सामाजिकदृष्टया आपल्या बरोबरीचे वाटत नाहीत. हिंदू जनमानसात ही जी सामाजिक विषमतेची भावना खोल रुजलेली आहे, तिच्या विरुध्द दलितांचे युध्द आहे. आणि या युध्दातले एक शस्त्र म्हणून त्यांना साहित्य वापरावयाचे आहे.[६]

अस्पृश्य मानल्या गेलेल्या सगळ्याच जाती आर्थिकदृष्टया दलित नाहीत. 'दलित'पेक्षा 'अस्पृश्यता' अधिक भयंकर आणि अमानुष आहे. ही अमानुषता ज्या जातीना सोसावी लागली आहे, त्या जातीसंबंधानेच हे विवेचन असल्यामुळे मी अस्पृश्य हा शब्द रूढी प्रमाणे अस्पृश्य मानला गेलेला या अर्थी वापरत आहे.[७]

दलित साहित्यविषयक विवेचनामध्ये रा॰ भि॰ जोशी हिंदूच्या सांस्कृतिक परंपरेनेंच अस्पृश्यांना वाईट रितीने वागविले असल्याने हिंदू साहित्य आणि साहित्य परंपरेला त्याचा विरोध आहे असे सांगतात॰ त्याच्या स्वीकाराला ते नकार देतात॰ विषमते विरुद्ध ते विद्रोही पवित्रा घेऊन लढण्यास सिद्ध होतात॰ दलित साहित्य हे सामाजिक मूल्य प्रस्थापित करण्यासाठी जन्मते असे जोशी म्हणतात॰

प्रभाकर मांडे : दलित साहित्यातील निराळेपण व्यक्त करताना म्हणतात, " दलित साहित्य हे समाजगटातील व्यक्तीच्या अनुभवांना अभिव्यक्त करणारे असते .... दलित साहित्य हे त्याच्या निर्मात्यावरून निश्चित होत नाही, तर त्याच्या अनुभवावरून, त्याच्या निराळेपणावरून ठरते .... हे साहित्य व्यक्तिनिर्मित असले तरी त्या व्यक्तीच्या मनाचे निराळेपण त्या साहित्यातून प्रकट होण्याऐवजी समाजगटाच्या अनुभवांचे निराळेपण त्यातून विशेषत्वाने जाणवते .... दलित लेखक समष्टीच्या भावनेचा प्रतिनिधी या नात्याने अविष्कार करतो, त्याचवेळी वैयक्तिक पातळीवर जीवनातील समस्येशी झुंज देत असतो॰'

दलित साहित्य हे निश्चित प्रयोजन असलेले साहित्य आहे॰ ते एक हत्यार आहे, शस्त्र आहे॰ सामाजिक जाणिवा व्यक्त करणे, वाचक, श्रोत्यांच्या मनावर विशिष्ट परिणाम घडवून आणणे, स्वकीयांना क्रांतीसाठी उद्युक्त करणे, त्यांच्यात अन्यायाविरुद्ध लढण्याची युयुत्सु वृत्ती निर्माण करणे, अशी विविध प्रयोजने या साहित्यनिर्मितीच्या मूळाशी असतात॰'

मांडे दलित साहित्याकडे सामाजिक लढयाचे शस्त्र म्हणून पाहतात॰ साहित्याचे चित्रण करणाऱ्या व्यक्तीला आणि अनुभवाच्या निराळेपणाला महत्त्व देतात॰ जन्मजात दलितत्वापेक्षा त्या साहित्यातील विचाराचे

निराळेपण ते लक्षात घेतात. जे आजपर्यन्त कधीच साहित्यात आलेले नव्हते अशा निराळ्या अनुभवांना ते महत्त्व देतात. माणसाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे, स्वकीयांच्यामध्ये क्रांतिज्योत प्रज्ज्वलित करणे हा प्रयत्न ज्या साहित्यात केलेला असतो त्यालाच मांडे दलित साहित्य म्हणतात. मात्र वैयक्तिक दुःखाशी झुंजताना ते दुःख विश्वात्मक करावे अशीही त्यांची विचारधारा आहे.

दया पवार : या जातिव्यवस्थेसंबंधी ज्यांना चीड, संताप, अगतिकता, घृणा आणि नवीन जीवनाचा वेध घेण्याची युयुत्सू वृत्ती आहे, यांचा आविष्कार जो कुणी उत्कटतेने काळजाला भिडणाऱ्या भाषेत करील, तो मग दलितच असेल असे नाही, ज्याला ही अनुभूती भावेल तो ती व्यक्त करील ...."असे म्हणतात. मात्र लगेच पुढे " दलितांच्या जन्माबरोबरच दुःखाचाही जन्म झाला, हे जोपर्यन्त सत्य आहे तो पर्यन्त असे साहित्य निर्माण होत राहणार " .... असे सांगून जन्मजात दलितच स्वाभाविकपणे अशा प्रकारचे साहित्य निर्माण करू शकतो. हेही ते सांगतात. " समाजातील साचलेपण जाऊन जीवनओघ दुथडी भरून वाहणार आहे, जुन्यारुढी गळून पडणार आहेत असे ते मानतात. ज्यांचा संताप बदल मागण्याकरिता आहे.[9] आपला विचार स्पष्ट करताना ते म्हणतात, "हे साहित्य आंबेडकरवादी आहे की मार्क्सवादी आहे याच्यावर फारसा विचार करण्यात अर्थ नाही. खरा लढा सामाजिक दायित्व व कलावाद यांच्यात आहे. दलित साहित्य हा कोणताही वाद मानीत नाही.[10] जाति व्यवस्थेने निर्माण झालेले दुःखाविरोधी हृदयस्पर्शी भाषेत निर्माण झालेले साहित्य म्हणजे दलित साहित्य असा त्यांचा दृष्टिकोन आहे. जन्मजात दलितत्व दुःखाला जन्म देते, रुढी त्यावर डागण्या देतात म्हणून रुढी जातिव्यवस्थेला हे साहित्य नकार देऊन सामाजिक भाषेने विद्रोह पुकारते असे दया पवार समजतात.

रा॰ ग॰ जाधव : विद्रोहाला महत्त्व देऊनच आपली भूमिका मांडतात॰ " मराठी विद्रोही साहित्य हे अल्पसंख्यांक दलितांच्या अनुभवाचे साहित्य आहे॰ विद्रोही साहित्यिक कोणत्याही हेतूने वाङ्मय निर्माण करीत असला तरी त्यात पीडित समाजाच्या व्यथा वेदनांची चित्रे हाच मुख्य आशय असतो॰ हा आशय विद्रोही समाजातील वाचकांना झटकन समजतो॰ तो त्यास प्रत्यकारी वाटतो॰ त्यात त्याचे प्रतिबिंब त्यास दिसू शकते॰ त्याला जे भावत होते, जाणवत होते, जे अस्वस्थ, निराश आणि दुःखी करीत होते, पण जे त्याला समर्थपणे व्यक्त करता येत नव्हते, ते सर्व त्याला विद्रोही साहित्यात अगदी हुबेहूब व्यक्त झाल्याचे दिसू शकते॰ विद्रोही समाज आणि साहित्य यात झटकन एक मनोमय संवाद साधला जातो॰ एवढेच नव्हे तर त्या साहित्यात जे सांगितले आहे, त्यापेक्षाही त्यात जे सुचविले आहे, त्याचे आकलन विद्रोही समाजातील व्यक्तीला सुलभतेने होऊ शकते ते साहित्य म्हणजे त्या समाजाची जणू एक संकेतलिपीच आहे॰"[११]

दुःखित, पीडित समाजाच्या वेदनांचे चित्रण प्रक्षोभकरित्या, विद्रोहीभावनेने साकार करणाऱ्या दलितांच्या साहित्याला जाधव विद्रोही साहित्य असे म्हणतात॰ सामाजिकदृष्टया अल्पसंख्य दलितांच्या जीवनानुभवाला आलेले दृश्य स्वरूप म्हणजे दलित साहित्य असे रा॰ ग॰ जाधव यांनी आपल्या विवेचनात म्हटल्याचे दिसून येते॰

केशव मेश्राम दलित साहित्याबद्दल आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, "हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय होत गेलेला आहे अशा अस्पृश्यांनाच दलित हा शब्द लावावा आणि याचा वर्गातील साहित्यिकांनी लिहिलेल्या लिखाणास दलित साहित्य ही संज्ञा द्यावी॰" दलितांनी दलितासाठी लिहिलेल्या साहित्यालाच दलित साहित्य म्हणावे असा मेश्राम यांची यातील दृष्टी सामाजिक व सांस्कृतिक जाणिवेची

आहे. त्यांनी समाजपध्दतीतील प्रत्यक्षातील जातीय पध्दती पाहूनच ही दृष्टी घेतली असावी. वर्म पध्दतीचा, प्रश्न व्यवस्थेचा ती स्वीकार करूच शकत नाही.[१२३] अन्यायाची चीड, विषमतेविरुध्दचा संताप, जन्मजात दलितत्व या गोष्टींचा प्रा. मेश्राम यांनी आपल्या भूमिकेत विचार केला आहे.

हिंदूधर्म, त्यातील चातुर्वण्यपध्दती तिच्यामुळे निर्माण झालेली विषम समाजरचना, ह्यातून निर्माण झालेले ऊच्चनीच हे भेद व या भेदातूनच दलित साहित्यिकाच्या मनात नवनिर्मितीच्या ठिणग्या उडू लागतात. जातीधर्म यामुळेच दलितांच्या दुःखी जीवनात वेदना प्रसवतात हे समजल्याने धर्म, जात, प्रथा, परंपरा याला नकार देणे हे दलित साहित्याचे आदिकर्तव्य ठरते. हा नकार संतापाचा असल्याने विद्रोहाचे स्वरुप घेऊनच तो साहित्यात येतो. उपरोक्त भूमिकांमध्ये नकार, विद्रोह, जन्मजात दलितत्व या गोष्टींना प्राधान्य दिल्याचे दिसते. अशाच पध्दतीने सामाजिक आशयाला महत्त्व देऊन दलित साहित्यविषयक विचार करण्याचा प्रयत्न नरहर कुरुंदकर, भालचंद्र फडके, शंकरराव खरात यांनी केलेला दिसतो. उपरोक्त भूमिकांचे निरीक्षण केल्यावर आपणास काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतील.

- धर्म, रूढी, परंपरामुळे दलितांना दुःख भोगावे लागले म्हणून त्यांना नकार दिला जातो.
- नकाराच्या चिडीने, संतापाने वरील गोष्टीवर प्रहार करताना त्यांची भाषा, साहित्य विद्रोही स्वरूप धारण करते.
- विषमतेविरुध्द लढण्याची त्यांची सिध्दता आहे. म्हणजेच नकार, विद्रोह, प्रक्षोभ हाच दलित साहित्याच्या स्वरूपाचा गाभा आहे असे वरील विचारवंताचे मत दिसते.

आर्थिक शोषणाला प्राधान्य देणाऱ्या भूमिका

सदा कऱ्हाडे दलित हया 'संज्ञे' विषयी म्हणतात, "आर्थिक दृष्टया व सामाजिक दृष्टया मिळून एक सर्वसमावेशक दलित वर्ग मानता येईल. त्यात कामगार, शेतमजुर , उपजीविकेसाठी श्रमणारे आणि अस्पृश्यही येतील ज्यांची पिळवणूक होते ते दलित."[१४] दलित साहित्याकडे कऱ्हाडे आर्थिक दृष्टिकोनातून पाहतात. ज्यांचे आर्थिक शोषण होते त्यांना दलित म्हणावे अशी त्यांची विचारसरणी आहे. दलित साहित्य मार्क्सवादी असू शकते असे ते म्हणतात.

कऱ्हाडे यांनी आर्थिक विचाराला प्राधान्य देऊन ज्याची पिळवणूक होते तो दलित असे म्हटले असले तरी, एखाद्या उच्चवर्णीयाची पिळवणूक होत असेल तर त्याला दलित मानता येईल काय ? हा प्रश्न पुढे उभा राहतो. दलितही जाती, वर्णव्यवस्थेमुळे भोगाव्या लागणाऱ्या दु:खामुळे संतप्त होऊन त्याच्या विरोधात उभा राहतो. पण ज्याची पिळवणूक होते आहे असा मध्यम किंवा उच्चवर्गीय; वर्ण आणि जातीव्यवस्थेविरुद्ध पेटून उठणार नाही. म्हणून डॉ. कऱ्हाडे यांची ही भूमिका अतिव्याप्त वाटते.

नामदेव ढसाळ यांनी दलित पँथरची भूमिका सांगताना, 'अनुसूचित जाती-जमाती, बौध्द, कष्टकरी, जनता, कामगार, भूमिहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती यांना दलित म्हटले आहे. अन्न,पाणी,वस्त्र, निवारा, नोकरी, जमीन, अस्पृश्यता, सामाजिक, शारीरिकअन्याय हे दलितांचे प्रश्न आहेत आणि या सर्वच प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी त्यांना सर्वंकष बदल हवा आहे.'[१५] दलितामध्ये ढसाळांनी ज्यांचा समावेश केला आहे ते पाहिले तर लक्षात येते की, ढसाळ ज्यांची आर्थिकदृष्टया

पिळवणूक झाली आहे, त्यांना दलित समजतात व त्यांच्या साहित्याला दलित साहित्य म्हणतात. त्याचे जे प्रश्न आहेत ते अर्थकारणाशी निगडीत आहेत. ढसाळांवर अर्थिक दृष्टिकोनाचा पगडा असल्याचे दिसून येते.

वसंत पळशीकर म्हणतात, 'दलितामध्ये महार व नवबौध्द आहेत तसेच इतर पूर्वास्पृश्य जातीचेही लोक आहेत. इतकेच नाही तर आदिवासी व सवर्ण जातीचे लोक पण त्यात मोडतात. सामाजिक अन्याय, जुलूम, भेदाभेद आणि आर्थिक शोषण यांचा अनुभव या सर्वांनाच आला आहे. व येत आहे. त्यापैकी सर्वांची पिळवणूक एकाच जातीने केली आहे असे नाही'.[१६] पळशीकरांच्या या विधानातून ज्याची पिळवणूक होते, त्यांचे साहित्याला दलित साहित्य म्हणावे असे ते म्हणतात.

वि. वा. शिरवाडकर दलित कोण ? या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणतात, 'ब्राम्हणापासून बौध्दपर्यन्त सर्व जातीत कमी अधिक प्रमाणात दलित वर्ग पसरलेला आहे'.[१७] या त्यांच्या विधानातून ते जन्मजात दलितत्वापेक्षा आर्थिक शोषणाच्या विचारालाच महत्त्व देताना दिसतात.

अर्जुन डांगळे 'भारतीय समाजातील जातिव्यवस्था, अस्पृश्यतेसारखे तिचे भीषण स्वरूप, इथली शोषण व्यवस्था या सगळ्यांची जाणीव होऊन ती विरुध्दची कठोर प्रतिक्रिया म्हणजे दलित साहित्य. दलित साहित्याच्या संदर्भात दलित ही एक जात नसून ती एक जाणीव आहे. समजातील तळागाळातील लोकांच्या अनुभवाशी, त्यांच्या सुख दुःखाशी, त्यांच्या संघर्षावर असीम श्रध्दा आणि निष्ठा बाळगणारी ही जाणीव समाजशास्त्रीय दृष्टिकोनामुळे अधिक प्रगल्भ आणि शास्त्रीय होत जाते. म्हणूनच ती विद्रोह, नकार आणि विज्ञाननिष्ठा या सूत्राशी बांधली जाऊन ती अंतिमतः क्रांतीकारी होते. दलित म्हणजे शोषित, पीडित असा समाज, धर्माच्या नावाखाली व अन्य कारणाने ज्यांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक शोषण केले

जाते तो माणूस आणि हाच माणूस क्रांती करू शकेल असा दलित साहित्यिकांचा विश्वास आहे.[११८] डांगळेची भूमिका मार्क्सवादी विचाराकडे झुकलेली दिसते. धर्म ही इथली प्रबळ सत्ता आहे. तिच्या सहाय्याने अस्पृश्यता निर्माण करून त्यांचे ती सर्वस्व शोषण करते. म्हणून तिला विद्रोही प्रवृत्तीने, विज्ञाननिष्ठ दृष्टीने नकार देते ते दलित साहित्य. ज्याचे शोषण केले जाते असा माणूस क्रांतीचे नेतृत्व करील असे डांगळेंना वाटते.

म. ना. वानखडे म्हणतात, 'दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौध्द अथवा मागासवर्गीय नव्हेतर, ते जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व दलित या व्याख्येत समाविष्ट होतात.'[११९] सूड च्या प्रस्तावनेमध्ये सांगितलेल्या दलित साहित्याच्या भूमिकेमध्ये वानखडे यांनी बदल केल्याचे जाणवते. बौध्द, मागासवर्गीयांसोबत ज्यांचे शोषण झाले आहे अशा सर्वांना ते दलितात सामावून घेतात. सर्व शोषितांच्या जीवन चित्रणाला ते दलित साहित्यात स्थान देतात. या ठिकाणी दलित साहित्याकडे आर्थिक दृष्टिनेच पाहतात. दलित साहित्याकडे वर्गीय दृष्टिने पाहून, शोषण विचाराला ते प्राधान्य देतात.

शरच्चंद्र मुक्तिबोध म्हणतात: 'स्वातंत्र्य हा दलित वाङ्मयाच्या जाणिवेचा गाभा आहे. तेव्हा दलित वाङ्मयामागील जाणीव आणि पुरोगामी लेखकाची जाणीव भिन्न मूल्यधिष्ठित नाही. विरोधी नाही. ... दलित लेखकाची जाणीव खऱ्याखुऱ्या मानवी स्वातंत्र्याचा अविष्कार करू शकल्यास या जाणिवेद्वारे श्रेष्ठ वाङ्मयनिर्मिती होणे शक्य आहे. दलित लेखकाची जाणीव बाह्य जीवनातील व मनोजीवनातील विसंगतीचा प्रत्यय आणून देणारी मूल्यगर्भ व प्रामाणिक आहे .... भारतीय मानवतेचा तो एका पातळीवरील उद्गार आहे. पुरोगामित्वाचा तो एक स्वतंत्र अविष्कार आहे.'[१२०] पुरोगामी साहित्य साम्यवादी असू शकते व साम्यवादी साहित्य हे मार्क्सवादीच्या शोषण व्यवस्थेचा विचार करते. मुक्तीबोधांच्या

या भुमिकेत ही आर्थिक दृष्टिकोन पायभूत आहे.

या वर्गवारीमध्ये येणाऱ्या भूमिकांच्या परामर्श घेतला तर असे दिसून येते की, या भूमिकांमध्ये शोषण विचाराला प्राधान्य दिलेले दिसते. वर्गीय विचाराचा प्रभाव या भूमिकांवर आहे. आर्थिक दृष्टिकोनातून दलित साहित्याकडे पाहणाचा काही विचारवंत कसा प्रयत्न करतात ते इथे स्पष्टपणे दिसून येते. पिळल्या गेलेल्या, शोषीतांचा विचार दलित साहित्य करते असा या विचारवंताच्या म्हणण्याचा मतीतार्थ आहे.

समन्वयवादी व्यापक भूमिका

बाबुराव बागूल यांची भूमिका ही वरील दोन भूमिकांचा समन्वय करणारी आहे असे म्हणता येईल. ते म्हणतात, " अस्पृश्यतेशी आणि दास्याशी विषमतेशी आणि दुःखाशी दलित साहित्याचे वैर आहे. जो पर्यन्त अस्पृश्यता दास्य, हे या देशात असेल, या जगात असेल तो पर्यन्त दलित साहित्य आहे. हे निश्चित आहे.[२१] असे सांगून बाबुराव बागूल हिंदूधर्माच्या मानसिकतेच्या प्रभावाचे वर्णन करताना म्हणतात, 'अनेक सुधारकांना, विचारवंताना त्यांचे शत्रू दिसत होते.... कार्ल्सवाद्यांना आणि समाजवाद्यांना त्याचे शत्रू दिसतात. अनेक राजकीय पक्षांना त्यांचे विरोधक शत्रू दिसतात, पण आमचा शत्रू तर अदृश्य आहे. तो ग्रंथात आहे, भाषेत आहे, शब्दात आहे, विचारात आहे. तो मनात आहे. प्रचंड असूनही सर्वव्यापी आणि अदृश्य असलेल्या शत्रूबरोबर आमचे युद्ध सुरु झालेले आहे.[२२] म्हणून वर्णव्यवस्था, दास्यत्व, विषमता नाकारायची असेल तर, बाबुराव बागूल सांगतात, 'आपला नायक हा स्टॅलिनसारखा असायला हवा. आपला नायक हा माओसारखा असायला पाहिजे. आपला नायक हा डॉ. आंबेडकरांसारखा असायला पाहिजे. तरच आपण नवा नायक घडवू शकतो, नवी वैचारिकता मांडू शकतो. आणि म्हणून आम्ही एक सूत्र मांडलेले आहे की, हे जे जुने आहे, त्या सर्वांना

नाकारतो.[१२३] दलितांच्या दुःखाची कारण मीमांसा सांगताना ते म्हणतात, " दुःखाला, दैन्याला, दास्याला कारण आहे-जात. जातीला कारण आहे.- वर्णव्यवस्था. वर्णव्यवस्था टिकवून धरणारा आहे हिंदूधर्म म्हणजे पक्षपाती धर्म - उच्च वर्णाला सर्व काही देणारा - आणि हीन वर्णियांना सर्व काही नाकारणारा - विषमतेचा पक्का पहारेकरी. त्याच्या व्यवस्थेमुळेच हे सर्व मिळाले. हया देशात जन्मल्यामुळे हिंदूधर्म वाट्याला आला आणि हिंदूधर्मामुळे हे दुःख, दैन्य, दास्य वाट्याला आले .... नको - हा जन्म नको. हे जगणे नको. - हे आईबाप नकोत - हा देह नको - हा धर्म नको - हे लोक नकोत - नकार वाढत जाई.[१२४] हिंदू धर्माने निर्माण केलेल्या व्यवस्थेलाच ते नकार देऊन असली भूमिका मांडतात असे नाही तर, ते माणसाला महान मानतात. ते म्हणतात, माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य असते ते दलित साहित्य असते.[१२५] हा विचार आणखी स्पष्ट करताना ते म्हणतात, "दलित साहित्य म्हणजे सूडवादाचे साहित्य नाही. दलित साहित्य हे विद्वेष पसरविणारे साहित्य नाही. दलित साहित्य हे माणसाच्या महत्तेचा आणि मुक्तीचा प्रथम पुरस्कार करते.... या देशात माणसाचा भयंकर अवमान झालेला आहे. माणसांचा एका व्यवस्थेने कोंडी करून मुडदा पाडलेला आहे. आणि म्हणून दलित साहित्य माणसाला केंद्र करते. माणसाच्या स्वातंत्र्याचा प्राणपणाने उच्चार करते. माणसाला महान मानते आणि देवधर्माहून माणसाहून महान मानते.[१२६] देवाहून महान मानलेल्या माणसालाच ते आपल्या साहित्याचे नायकत्व बहाल करतात. ते म्हणतात, "दलित हा आजच्या युगाचा नायक आहे. दलित हा आजच्या संबंध क्रांतिकारक उलथापालथीचे केंद्र आहे आणि दलित हा इतिहास, पुराणांनी उपेक्षित वंचित आणि तिरस्कृत ठरविलेला समाज आहे. जो श्रम करतो त्या श्रम करणाऱ्याचे नेहमीच या विषमतापूर्ण समाजामध्ये तिरस्कृत, तुच्छ म्हणून वर्णन केलेले आहे आणि त्याला तसा ठेवण्यामध्ये त्याचे स्वार्थ

साधले जात असत. असा हा जो दलित आहे, ज्याची या सर्व संस्कृत वाङ्मयामधून आणि इतिहासामधून, शास्त्रामधून आणि पुराणामधून उपेक्षा केलेली आहे. तो उपेक्षित आम्ही आमचा नायक ठरविलेला आहे आणि तो यासाठी ठरविलेला आहे की, तो जातीने कोणी आहे हा त्याच्यातील महत्त्वाचा भाग नाही; तर त्याची उपेक्षा झालेली आहे आणि या युगाने त्याला शिरोधार्य मानलेले आहे त्याला आम्ही नायक केलेले आहे, श्रेष्ठ मानलेले आहे, तो अधिक संख्येनं आहे म्हणून.'[२७] दलित साहित्याकडे संकुचित दृष्टीने न पाहता त्याला ते विश्वात्मकता देतात. ते म्हणतात, 'दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उध्वस्त करु बघणारा.... दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा .... दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रत्यंकारी केलेले आहेत आणि ज्याच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करुन दिलेली आहेत तो. या आपल्या दलितां-च्या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रो एशियाई देशा-तील अस्पृश्य, आदिवासी, शोषित पीडित येतात.'[१२८] ही दलित साहित्यातील विश्वात्मकता स्पष्ट करताना ते म्हणतात, 'माणूस मला मोठा वाटतो, तेव्हा माणसापेक्षा देव मोठा वाटत नाही-माणसापेक्षा देश मोठा वाटत नाही-माणसापेक्षा धर्म मोठा वाटत नाही, कारण हे की, दैन्य दिसलेले असते त्यालाच माणूस दिसलेला असतो. तसा माणूस केवळ भारतातलाच नसतो, केवळ महार नसतो, केवळ मांग नसतो तर तो जागतिक होतो. माणसाचं शरीरच मुळी हे विश्वात्मक आहे असे मी म्हणतो तेव्हा रशियन माणसाची गोष्ट किंवा फ्रेंच माणसाची गोष्ट किंवा अमेरिकन माणसाची गोष्ट किंवा आष्ट्रोलियन माणसाची गोष्ट आम्हाला जी कळते - त्याचे सुखदुःख कळते. त्याच्या भावना या सारख्याच आहेत. हे सारखेपण शरीरातूनच प्राप्त झालेले आहे. शरीराच्या

अविष्करातून झालेले आहे. तेव्हा आम्ही असे म्हणतो की, माणसाला जात नसते, माणसाला देशही नसतो, माणूस विश्वात्मक असतो, ही विश्वात्मकता दैन्यामुळेही सहजपणे साधून जाते आणि म्हणून आमचे म्हणणे असे आहे की, ज्यांनी दैन्य पाहिलेले आहे, ज्यांनी दास्य पाहिलेले आहे, ही माणसे - ज्यांनं हे दृढ केलेले आहे- धर्माला- ज्याने दैन्य आणि दास्य दृढ केलेले आहे आणि देशालासुध्दा की जो हे टिकवून धरतो, सीमाबध्द करतो त्याला आम्ही मानत नाही.[२९]

अशा त-हेने बाबुराव बागूलांची दलित साहित्यविषयक आपली भूमिका अनेक ठिकाणी मांडली आहे. ती विद्रोह, नकार यांचा पुरस्कार करतेच पण ती माणसाला महत्ता देते, विश्वात्मक विचार करायला लावते. त्यांची भूमिका व्यापक आहे. संकुचिततेच्या भिंती उल्लंघणारी आहे. त्यांच्या भूमिकेतील विचारांची वैशिष्टये आपणास थोडक्यात सांगता येतील.

हिंदूधर्माने निर्माण केलेल्या विषमाधिष्ठित समाजातील विषमतेला त्यांचा विरोध आहे. म्हणूनच हिंदूधर्मातील सर्वच गोष्टींना ते विरोध करतात.नकार देतात.या गोष्टीना नकार देत असतानाच माणूस आणि त्याची प्रतिष्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे की गोष्ट स्विकारतात.दलित साहित्य हे क्रांतिकारी असून ज्ञानविज्ञानाचा पुरस्कार करणारे आहे, शोषण करणा-या विरोधात उभे राहणारे आहे. बागूलांनी सांगितलेल्या दलिताला स्थल-काल-लिंगाच्या मर्यादा पडणार नाहीत हे दलित साहित्य आशावादी, युगप्रवर्तक आणि विश्वव्यापी आहे.

सामाजिक शोषणाच्या जोडीलाच ते आर्थिक शोषणाला महत्व देतात. उच्चवर्णीया विरूध्दच्या विद्रोह, प्रक्षोभासह शोषित, पीडितांच्या वेदनांना दलित साहित्य चित्रित करते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आपल्या भूमिकेमध्ये मानवमुक्तीसाठी लढा देण्याचा पवित्रा घेतात. हा लढा संकुचित स्वार्थसाठी नाही. कोणा एका गटाच्या कल्याणासाठी नाही तर, आखिल मानव जातीच्या कल्याणाकरिता, माणसाला प्रतिष्ठा देण्याकरीता त्यांचा लढा आहे. या बागूलांच्या भूमिकेचे यथार्थ वर्णन करताना लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, " माणसाची माणूस म्हणून असलेली प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि समता ही मूल्ये समाजात दृढपणे प्रस्थापित व्हावीत हे दलितांच्या लढयाचे अंतिम उदिष्ट असल्यामुळे हा दलितांनी एकाकीपणे लढाव्याचा लढा नाही, मानव जातीच्या विमोचनासाठी चाललेल्या एका व्यापक लढयाचा भाग म्हणून त्याच्याकडे पाहिले पाहिजे. हा एक अतिशय महत्वाचा विचार दलितांच्या आंदोलनात व दलित साहित्यात प्रस्तुत होत आहे.[३०]

आर्थिक समता, माणसाची प्रतिष्ठा, शोषणमुक्त समाजरचना ही मार्क्सवादी विचारसरणी आणि वर्णविरहीत समाजरचना, विषमतेचा तिरस्कार, शिक्षणाचा पुरस्कार ही आंबेडकरवादी विचारसरणी, या दोहोंचा उत्कृष्ट समन्वय बागुलांच्या भूमिकेत आढळतो. आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद हे दोन्हीही माणूसमुक्तीचा पुरस्कार करतात. या दोन्ही विचारधारांचा प्रभाव त्यांच्या वैचारिकतेवर झाला असल्यामुळे त्यांच्या साहित्यात त्याचे प्रतिबिंब पडल्याशिवाय राहात नाही.

दलित साहित्यविषयक भूमिकांचा संकलित विचार.

मागे मांडलेल्या भूमिकांचा एकत्रित विचार केला तर असे दिसून येते की, त्या भूमिकांमधून प्रत्येक अभ्यासकाची एक वेगळीच दृष्टी दिसून येते. प्राधान्याने सामाजिक विषमतेचा, अस्पृश्यतेचा, निषेध करणारी एक व विशेषत्वाने आर्थिक शोषणाच्या विरूद्ध असणारी दुसरी, अशा दोन प्रकारच्या दलित साहित्यविषयक भूमिका मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला

आहे. ह्या दोन्हीपैकी एकेक गटातील भूमीका पर्याप्त, समावेशक वाटत नाहीत. त्या एका बाजूने विचार करणाऱ्या वाटतात.

या पार्श्वभूमीवर पाहिले असता बागुलांनी दलित साहित्याविषयी मांडलेली भूमिका ह्या दोन्ही घटकांचा समावेश करून त्यांना व्यापक मानवतेचे अधिष्ठान देणारी आहे याची कल्पना येते. प्रामुख्याने बागुलांच्या व इतर मान्यवरांच्या भूमिकांच्या साहाय्याने त्यांच्या कथा सृष्टीचे आकलन करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

स्वाभाविकपणेच बागुलांच्या कथात्मक साहित्याचे स्वरूप हे या भूमिकेने ठरलेले असल्याने त्यांची ही भूमिका मनात बाळगूनच त्याच्या कथात्मक साहित्याचा अभ्यास करायचा आहे, व दलित लेखक म्हणून बागुलांची कोणती वैशिष्टये त्यांच्या कथात्मक साहित्यात आढळतात याचा शोध घ्यावयाचा आहे.

प्रकरण पहिले

संदर्भ

१· म·ना· वानखडे — प्रस्तावना सूड, २ री आ·, मुंबई लोकवाङ्मय गृह, १९८१, पृ·७

२· म·भि·चिटणीस — दलित साहित्य: एक अभ्यास, संपा· अर्जुन डोंगळे, १ ली आ·मुंबई, महा· राज्य साहित्य-संस्कृती मंडळ, १९७८, पृ· २१४

३· ~~तत्रैव~~ — पृ· २१५ तत्रैव

४· गं·बा· सरदार — 'दलित साहित्य', अस्मितादर्श (आँगोडि, १९७५), पृ·४

५· राजा ढाले — मी आणि माझे लेखन, अस्मितादर्श (दिवाळी अंक, १९७६), पृ· १८४

६· रा·भि· जोशी — दलित साहित्य, सत्यकथा (जुलै, १९७२) पृ·४

७· रा·भि· जोशी — मराठी साहित्यपरंपरा व दलितवर्गातील लेखक (अस्मितादेशी) (दिवाळी अंक १९७०), पृ· १३४-३७

८· प्रभाकर माडे — 'दलित साहित्याचे निराळेपण', अस्मितादर्श (आँगोडि, १९७५), पृ· ७-१०

९· दया पवार — परंपरा नाकारणाऱ्या वृत्तीतूनच उद्याचे धगधगते वाङ्मय निर्माण होईल, दलित साहित्य: एक अभ्यास, संपा· अर्जुन डांगळे, १ ली आ·, मुंबई, महा· राज्य साहित्य-संस्कृती·मंडळ, १९७८; पृ·५२-५९

१०· दया पवार — परिसंवादवृत, अस्मितादर्श, (मे-जून, १९७७), पृ·४४·

११· रा·ग· जाधव — साहित्य आणि सामाजिक संदर्भ, १ ली आ·, पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, मे १९७५, पृ· पृ· ७४-७५

१२· सुधाकर अनवलीकर — शंकरराव खरात, दलित साहित्य स्वरूप आणि प्रेरणा, १ ली आ·, पुणे, इनामदार बंधू प्रकाशन, मार्च, १९७० पृ·३२ वरून उधृत·

१३· ———— — तत्रैव, पृ· ३२ वरून उधृत

१४· सदा कऱ्हाडे — 'दलित साहित्याच्या निमित्ताने,' सत्यकथा, (जुलै, १९७०), पृ·६८

१५· नामदेव ढसाळ — 'दलित पंथरची भूमिका,' आम्ही, (दिवाळी अंक, १९७३) पृ·७८·

१६· वसंत पळशीकर — 'दलितांचे साहित्य,' समाज प्रबोधन पत्रिका, (जोन/फेब्रु, १९७०), पृ·२८

१७· वि·वा·शिरवाडकर, — 'जुन्या परंपरेच्या मर्यादा त्याज्य परंतु तिची सामर्थ अभिमानास्पद,' संपा· अर्जुन डांगळे, पूर्वोक्त, पृ·३१-३५

१८· अर्जुन डांगळे, पूर्वोक्त,पृ·४१

१९· म·न· वानखडे 'मित्रहो, बेजबाबदार लेखकाची सद्दी संपली आहे,' संपा· अर्जुन डांगळे पूर्वोक्त २३१-२४३

२० शरच्चंद्र (मुक्तिबोध अस्मितादर्श (दिवाळी अंक,१९७१)पृ·३-६

२१· बाबुराव बागूल 'दलित साहित्य सूड्वाधांचे साहित्य नाही,' दलित साहित्य: आजचे क्रांतिविज्ञान,१ ली आ·,नागपूर, बुधिदष्ट पब्लिशिंग हाऊस, आँगष्ट १९८१,पृ·२५९

२२· ———— तत्रैव पृ· २५९

२३· बाबुराव बागूल, 'दलित हाच युग नायक,' पूर्वोक्त पृ·२७७·

२४· बाबुराव बागूल स्वगत, जेव्हा मी जात चोरली होती, २ री आ·, मुंबई, अभिनव प्रकाशन, एप्रिल १९७६,पृ·१२७

२५· बाबुराव बागूल पूर्वोक्त पृ· २५९

२६ बाबुराव बागूल 'दलित साहित्य म्हणजे सूड्वाधांचे साहित्य नाही,' पूर्वोक्त पृ· २६३

२७· बाबुराव बागूल पूर्वोक्त पृ· २८०

२८· बाबुराव बागूल 'दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडणारा,' पूर्वोक्त पृ· २७१

२९· बाबुराव बागूल पूर्वोक्त पृ· २८२

३०· लक्ष्मणशास्त्री जोशी दोन शब्द पूर्वोक्त पृ·२